त्यामुळेच त्याचे महत्व अधिक आहे.

आंतरराष्ट्रीय लेखांकन प्रणालीचा वापर करून तयार केलेली आर्थिक पत्रके प्रामुख्याने पुढील उद्दिष्ट्ये साध्य करतात -

१) आर्थिक नोंदीचे समजू शकेल अशा पद्धतीने सादरीकरण (Understandable)

२) आवश्यक व योग्य प्रकारची माहिती पुरवणे. (Relevances)

३) आर्थिक नोंदीची विश्वसनीय माहिती देणे (ईतगोवता) तसेच

४) एका कंपनीची भिन्न वर्षांसाठी वा भिन्न कंपन्यांची समान वर्षासाठी सहज तुलना करता येणे (comparable)

आंतरराष्ट्रीय लेखांकन प्रणालीचा वापर जगभरातील सर्वच देशांनी केल्यास एका वर्षासाठी वेगवेगळी आर्थिक पत्रके तयार करण्याचा खटाटोप तर वाचेलच; परंतु आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक खात्रीशीर व पारदर्शक माहितीच्या आधारे होऊ शकेल.

## IFRS ची उपलब्धता

IFRS Foundation च्या वेबसाईटवर सदर आंतरराष्ट्रीय लेखांकन मानदंडाची तपशीलवार माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. भारतात ICAI आपल्या सभासदांसाठी IFRS Certificate Course चालवते, तर इतर खासगी संस्थांमध्येसुद्धा याचे शिक्षण उपलब्ध होऊ लागले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा Diploma Course इंग्लंड येथील ACCA (Association of Chartered Certified Accountants)ही संस्था चालवते सदर परीक्षा सीए व्यतिरिक्त लोकही देऊ शकतात. या परीक्षेचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थादेखील भारतात उपलब्ध आहेत.

येथून पुढील काळात आंतरराष्ट्रीय लेखांकन प्रणालीचे महत्व केवळ वाढत जाणार आहे असे नाही, तर आर्थिक क्षेत्रात काम करण्यासाठी त्याचे ज्ञान असणे अनिवार्य होणार आहे. तरी आजपासूनच त्याची तयारी करणे लाभदायक ठरेल असे वाटते.

**प्रांजल जोशी**
mt.pragatifast@indiatimes.com
(लेखक चार्टर्ड अकाउंटंट आहेत.)

